पुढारी शहर-जिल्हा सिंधुदुर्ग, बुधवार, ८ जून २०२२



छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना भाई परमेकर. सोबत अन्य.

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन साजरा

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. यासाठी त्यांनी गड-किल्ल्यांची अगदी सुसज्ज अशी बांधणी केली. त्यांच्याच तंत्राचा वापर डच, इंग्रज यांनी घेतला. अष्टप्रधान मंडळात विविध जातीधर्मांच्या शिलेदारांना घेऊन महाराजांनी राज्यकारभार चालवला. त्यांचे आरमार प्रगत होते. अगदी मूठभर मावळ्यांना घेऊन त्यांनी शत्रूला सळो की पळो करून सोडले. असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी काढले.

हळबे महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य भाई परमेकर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मनोज पार्सेकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयीन विद्यार्थिनी पूजा पाटील हिने पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. भाई परमेकर यांनी शिवरायांच्या कर्तृत्वावर, कार्यपद्धतीवर बोलताना जाणता राजा यांनी रयतेच्या मनातील जनसुराज्याची कशी गुढी उभारली याची माहिती दिली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय खडपकर यांनी केले. आभार अस्मिता सावंत यांनी मानले.